# पारनेर दर्शन




■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे

वर्ष ३ अंक ४२, बुधवार १ जानेवारी २०२५ | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये


# नगर-पुणे इंटरसिटी रेल्वे पारनेरहून जाणार!

## रेल्वे मंत्रालयाचे मंजुरीपुर्व सर्वेक्षण

पारनेर : प्रतिनिधी

**नगर-पुणे इंटरसिटी रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणात रेल्वे मंत्रालयाने मान्यता देण्यापूर्वी मंत्रालयाच्या वतीने करण्यात आलेल्या मंजुरीपुर्व सर्वेक्षणात हा मार्ग पारनेर शहरातून जात असल्याची माहीती आहे.मंजुरीपुर्व सर्वेक्षणाप्रमाणे हा मार्ग मंजुर झाल्यास पारनेर शहरासह तालुक्यातील विविध गावांच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे.**

केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने दौंड ते येवला हा विभाग सोलापूर विभागाकडून पुणे विभागाकडे हस्तांतरीत केल्यानंतर नगर-पुणे इंटरसिटी मार्गास चालना मिळाली असून खा. नीलेश लंके यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात तसेच त्यापुर्वीही या मार्गासाठी पाठपुरावा केल्याने अखेर या मार्गाच्या सर्वे क्षणास मंजुरी मिळाली आहे. नगर ते औरंगाबाद या रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण सन २०२१ मध्ये पुर्ण करण्यात आले असून परळी-बीड-नगर या २६१ किलोमिटर लांबीच्या रेल्वे मार्गाचे काम दोन्ही बाजूंनी सुरू आहे. नगर ते पुणे या रेल्वेमार्गाची मागणी गेल्या पंधरा वर्षांपासून प्रलंबित होती. लोकसभा सदस्य झाल्यानंतर खासदार नीलेश लंके यांनी या मार्गासाठी पाठपुरावा सुरू केला होता. संसदेमध्ये गेल्यानंतर त्यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेउन हा रेल्वेमार्ग औद्योगिक, पर्यटन, शेत मालाची वाहतूक, पुण्यामध्ये शिक्षण, नोकरी, उद्योगाच्या निमित्ताने दररोज प्रवास करणारे प्रवासी तसेच धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी किती महत्वाचा आहे हे निदर्शनास आणून दिले होते.

खा. नीलेश लंके यांनी रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन या मार्गाचे महत्व अधोरेखीत केल्यानंतर रेल्वे मंत्रालयाच्या वतीने या मार्गाचे सर्वे क्षणाच्या मंजुरीपुर्व सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणात रेल्वे मार्गाची आवष्यकता, मार्गाचा विविध घटकांना होणारा लाभ याबरोबरच औद्योगिक, पर्यटन व धार्मिक स्थळांच्या कनेक्टिव्हिटीचा विचार करण्यात येउन सर्वेक्षण करण्यात आले होते.




### वाटाणा, तरकारी, फुलांची वाहतूक सुलभ होणार

पाचविला पुजलेल्या दुष्काळावर मात करण्यासाठी हा मार्ग उपयुक्त ठरेल. दुष्काळी तालुक्याच्या विकासासाठी पुरक ठरणा-या मार्गामुळे तालुक्याच्या पठार भागात उत्पादीत होणा-या व विशेषतः पुणे व मुंबईमध्ये मोठी मागणी असलेल्या वाटाण्याच्या वाहतूकीसाठी मार्गाचा उपयोग होईल. शेतकरी वर्गाला त्यातून चांगला फायदा होईल. वाटण्याबरोबरच इतर तरकारी माल, फळे, फुले यांच्या विक्रीसाठीही हा मार्ग सुलभ ठरणार आहे. वाहतूक खर्चात बचत होउन मोठी बाजारपेठ दृष्टीपथात येउन शेतकरी समृध्द होण्यास हातभार लागणार आहे.

### पर्यटनास चालना मिळणार

या मार्गामुळे तालुक्यातील पर्यटनाला मोठी चालना मिळू शकेल. निघोज येथील जगप्रसिध्द रांजणखळग्यांना भेटी देण्यासाठी हजारो पर्यटक निघोजला दरवर्षी भेटी देतात. वडगांव दर्या येथील लवन स्तंभही जगप्रसिध्द असून त्याचा अभ्यास करण्यासाठी अनेक अभ्यासक वडगांव दर्याला भेट देतात. तेथील निसर्ग तसेच वानसेना पर्यटकांना नेहमीच आकषक करते. पुर्णवादाचा सिध्दांत मांडणाऱ्या पारनेरकर महाराजांना भेटण्यासाठी देश विदेशातून पुर्णवादी भक्तगण पारनेरला हजेरी लावतात. या भक्तगणांचीही या मार्गामुळे मोठी सोय होणार आहे. या स्थळांबरोबरच पळशी येथील विठ्ठल मंदिर, पिंपळगांवरोठा येथील कोरठण खंडोबा, निघोज येथील मळगंगा माता, टाकळीढोकेश्वर येथील ढोकेश्वर मंदीर, विरोलीचे पिंपळेश्वर मंदीर, पारनेर शहर परिसरातील सिध्देश्वर व गणेश मंदिर ही स्थळेही भाविकांना आकर्षित करतात. त्या भाविकांची या रेल्वेमार्गामुळे सोय होणार आहे. पर्यटनात वाढ होउन स्थानिक बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल.

### कोहकडीतून रेल्वेमार्ग तालुक्यात प्रवेश करणार

भुसंपादन तसेच नगर-पुणे महामार्गाचा विचार करून हे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यानुसार पुणे जिल्हयातून निघालेला हा मार्ग पारनेर तालुक्याच्या कोहकडीमध्ये पारनेर तालुक्यात प्रवेश करणार आहे. पुणे जिल्हयातील रांजगणगांव गणपती एमआयडीसीच्या कनेक्टिव्हिटीनंतर सुपा एमआयडीसीच्या कनेक्टिव्हिटीसाठी पारनेरमार्गे सुपा व पुढे नगरकडे हा मार्ग जाणार आहे.

### कांदा निर्यातीचा पर्यायही होईल खुला

पारनेर तालुक्यात पिकविलेल्या गेलेल्या कांद्याला विशेषतः आखाती देशातून मोठी मागणी असते. त्यामुळे पारनेरमध्ये पिकविलेला कांदा अनेक निर्यातदार व्यापारी खरेदीसाठी पारनेरच्या बाजार समितीमध्ये हजेरी लावतात. कांदा उत्पादक शेतक-यांना रेल्वे बोगीचा पर्याय उपलब्ध झाल्यास शेतकरी आपल्या कांद्याची थेट निर्यातही करू शकतील.

### औद्योगिकरणास चालना

सुपा-पारनेर एमआयडीसीचा विस्तार करण्यात आल्यानंतर हे औद्योगिक क्षेत्र झपाटयाने विकसीत होत आहे. अनेक परदेशी उद्योग या क्षेत्रात सुरू झाले असून काही उद्योगांची उभारणी सुरू आहे तर अनेक उद्योग येणार आहे. महाराष्ट्रातील मोठया औद्योगिक क्षेत्रांमध्ये सुपा-पारनेर एमआयडीसीचा समावेश होऊ लागला असून रांजणगाव व सुपा औद्योगिक क्षेत्रातील दळणवळणाच्या मागणीचा विचार करून या मार्गाच्या सर्वेक्षणासाठी प्राधान्याने मान्यता देण्यात आल्याचीही माहीती आहे.

# अखेर वाल्मीक कराड पोलिसांना शरण

## सीआयडीच्या ताब्यात । कार्यालयासमोर समर्थकांची गर्दी

पुणे : प्रतिनिधी

**संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि खंडणी प्रकरणातील मास्टरमाईड वाल्मीक कराड याने पुणे शहर पोलिसांकडे सरेंडर केलेय. गेल्या काही दिवसांपासून तो फरार होता. त्यावेळी पुण्यात पोलिसांच्या कार्यालयाबाहेर कराड याच्या समर्थकांची मोठी गर्दी जमली होती.**



केज पोलीस स्टेशनला माझ्याविरोधात खोटी खंडणीची तक्रार दाखल झालेली आहे. अला अटकपूर्वचा अधिकार असताना मी पाषाण येथील सीआयडी कार्यालयात सरेंडर करणार आहे. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करावी आणि फाशीची शिक्षा करावी. राजकीय द्वोषापोटी माझं नाव जोडलं जात आहे. पोलीस तपासात जर काही सिद्ध झालं तर मी शिक्षा भोगण्यास तयार आहे, असे सरेंडर होण्याआधी वाल्मीक कराड यांनी सांगितले.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे राज्यात बीडच्या सुरक्षा व्यवस्थेची राज्यात चर्चा सुरू होती. विधानसभा अधिवेशनातही हा मुद्दा गाजला होता. गेल्या आठवड्यात बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चाही निघाला होता. या प्रकरणामुळे विरोधकांनीही सत्ताधाऱ्यांवर आरोपांचा सपाटा लावला होता. देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग केला होता. ९ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख याची अपहरण करून हत्या केली होती. या प्रकरणात आतापर्यंत चार जणांना पोलिसांनी अटक केली होती. वाल्मीक कराड याने आत्मसमर्पण केलेय. याप्रकरणातील पाचवा आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे. तीन आठवड्यांपासून वाल्मीक कराड फरार होता. वाल्मिक कराड याचा शोध घेण्यासाठी सीआयडीने स्पेशल पथके तयार करून मागावर लावली होती, त्याशिवाय त्याचा पासपोर्ट आणि बँक खाती फ्रीज केली होती. सर्व बाजूने अडचणीत आल्यानंतर वाल्मीक कराड याने शरण येण्याचा निर्णय घेतलाय.

वाल्मीक कराड शरण येणार याची बातमी सकाळी वाऱ्यासारखी व्हायरल झाली. त्यानंतर वाल्मक कराड याच्या कार्यकर्त्यांनी पुण्यात सीआयडी कार्यालयाबाहेर गर्दी केली होती. वाल्मीक कराड हे आरोपी नाहीत. ते खंडणीचा त्यांच्यावर खोटा आरोप, गुन्हा दाखल केला असल्याचे समर्थकांचे म्हणणं आहे.

बीड आणि अहमदनगरवरून आलेल्या समर्थकांनी सीआयडी कार्यालयाबाहेर गर्दी जमली होती

# डॉ.बोरुडे, प्रा. लोंढे यांना साहित्यरत्न पुरस्कार जाहीर

## ११ जानेवारी रोजी होणार वितरण । कारभारी बाबर यांची माहिती

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर साहित्य साधना मंच द्वारा देण्यात येणारे पारनेर साहित्यरत्न पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय बोरुडे व प्रा. विजय लोंढे यांना जाहीर झाला आहे. संस्थेतर्फे नुकतीच या पुरस्काराची घोषणा करण्यात आली.**



पारनेर तालुक्यातील नवोदित लेखक, कवींना प्रोत्साहन देण्यासाठी पारनेर साहित्य साधना मंच ही संस्था विविध उपक्रम राबवीत असते. या संस्थेतर्फे दरवर्षी पारनेर साहित्यरत्न पुरस्कार देण्यात येतात. निवड समितीची नुकतीच पारनेर येथे बैठक झाली. या बैठकीत विविध साहित्यिकांच्या नावावर चर्चा होऊन शेवटी डॉ. बोरुडे व प्रा. लोंढे यांची अंतिम निवड करण्यात आली. बैठकीला गझलकार संजय पठाडे, कथालेखक उर्वरीत पान ३ वर

# सरत्या वर्षाला निरोप देताना कर्डेकर भावूक !

## वर्षभरात गावाने गमावले अनेक प्रियजनांना ! अपघात, आजारपण आणि वार्धक्याचे निमित्त

शिरुर : सतीश डोंगरे

**सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नवीन वर्षाला हॅपी न्यू इयर**




**म्हणताना शिरुर तालुक्यातील कर्डे गावकऱ्यांचा स्वर यंदा काहीसा कातर झाला आहे.त्याला कारणही तसेच आहे, कर्डे गावाने मावळत्या वर्षात अनेक प्रियजनांना गमावले आहे. आजारपण, अपघात आणि वार्धक्य अशा घटना जिवितहानीचे कारण बनल्या आहेत.**


सरत्या वर्षाला निरोप देत नवी स्वप्नं, नव्या आशा, नवी उमेद व नाविन्याची कास धरत, नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी सर्वजण आतुर झाले आहेत. गावोगावी उत्साहाला उधाण आले आहे. पण हा उत्साह कर्डे गावात मात्र अजिबात नाही. कारण मावळत्या वर्षात यंदा मोठ्या संख्येने आप्तस्वकीयांना कर्डेकरांनी गमावले आहे. हे सर्वजण कुणाचे वडील, चुलते, कुणाचा पती, कुणाची आई, कुणाचा मुलगा, भाऊ, उर्वरीत पान ३ वर

# भक्ष्याचा पाठलाग करताना बिबट्या पडला विहिरीत !


## काळकुप येथील घटना । जखमी अवस्थेत बाहेर काढले

भाळवणी : अभिजित कपाळे

**पारनेर तालुक्यातील काळकुप येथील अडसुळ मळ्यात सोमवारी दि. ३० डिसेंबर रोजी रात्री अरुण साहेबराव अडसुळ यांच्या विहिरीत बिबट्या पडला. मंगळवार दि. ३१ रोजी सकाळी बिबट्या येथील नागरीकांच्या निदर्शनास आल्यानंतर या बाबतची माहिती वनविभागाला दिल्यानंतर बिबट्याला जखमी अवस्थेत बाहेर काढण्यात आले.**



याविषयी सविस्तर माहिती अशी की, काळकुप येथील अडसुळ मळा परिसरातील गणपती मंदिराच्या नजीक असलेल्या अरुण साहेबराव अडसुळ यांची शेतामध्ये विहिर आहे. या परिसरात नेहमीच नागरिकांची वर्दळ उर्वरीत पान ३ वर







शीख नववर्ष त्यांच्या नानकशाही कॅलेंडरनुसार येणाऱ्या वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजे १३ किंवा १४ एप्रिलला साजरं करतात. दहावे गुरू गुरूगोविंदसिंग यांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करतात, त्याला ते 'बैसाखी' म्हणतात. पंजाब आणि हरियाना राज्यात या दिवसांत पिकांची कापणी झाल्यानं शेतकऱ्यांच्या हातात पैसा आलेला असतो, लोक शेतात 'जत्ता आयी वैसाखी' गाणं म्हणत फिरतात, सर्व जण गुरुद्वारात जातात, भक्तिगीतं म्हणतात, कीर्तन ऐकतात, 'कराह' प्रसाद वाटतात आणि सर्वांसाठी जेवण म्हणजे लंगर असतो. बौद्ध धर्माचे लोक नवीन वर्ष एप्रिल महिन्यातल्या पहिल्या पौर्णिमेपासून तीन दिवस साजरं करतात. पारशी नववर्षाला 'जमशेट नवरोज' म्हणतात. २१ मार्चला ते साजरं करतात. पर्शियाचा राजा जमशेट यानं पारशी कॅलेंडर सुरू केले. नवरोज म्हणजे वसंत ऋतू, म्हणून 'जमशेट नवरोज' नाव पडलं. पारशी लोक या दिवशी घर स्वच्छ करून उदबत्त्या लावतात. घरात सगळीकडे चंदनाची पावडर टाकतात, त्यामुळे घरात हवा शुद्ध होते व ताजेतवाने वाटते. नववर्षाच्या

## धार्मिक महत्त्व

दिवशी घरातल्या टेबलावर ते धार्मिक ग्रंथ, झोराष्ट्रचं चित्र, आरसा, मेणबत्त्या, उदबत्त्या, फळं, फुलं, साखर, ब्रेड आणि नाणी इत्यादी वस्तू ठेवतात. त्यांच्या मते या सर्व वस्तू कुटुंबाच्या समृद्धीचं आणि दीर्घायुष्याचं प्रतीक आहेत. सर्व पारशी लोक या दिवशी अग्यारीमध्ये जातात आणि प्रार्थना करतात,



त्याला ते 'जशान' म्हणतात. ते चंदनाची पावडर तिथल्या अग्नीवर टाकतात. ख्रिस्ती धर्मात मात्र एक जानेवारीलाच खूप धूमधडाक्यात नववर्षाचं स्वागत केलं जातं. अशा प्रकारे अनेक धर्मांच्या प्रथा, परंपरा, संस्कृतीनुसार एक जानेवारीव्यतिरिक्त इतरही दिवशी पुन्हा नववर्ष साजरं करतात.

# वर्ष नवे, साज नवे

**जगभरात नववर्षाचं स्वागत करण्याच्या अनेक पद्धती विकसित झाल्या असल्या, तरी त्या सर्वांच्या मुळाशी एकच समान विचार असतो, तो म्हणजे 'जुने जाऊ द्या मरणालागुनी.' गेल्या वर्षातलं सगळं वाईट विसरायचं आणि नव्या वर्षाचं स्वागत करायचं. वेगवेगळ्या देशांमध्ये नववर्ष साजरं करण्याच्या पद्धती नक्की काय असतात, त्यांच्यामागे विचार, प्रथा काय असतात, याविषयीची रंजक माहिती...**

नववर्ष म्हणजे एक जानेवारी. हा जगातल्या प्रत्येकाला आवडणारा आणि प्रत्येकजण ज्याची आतुरतेनं वाट पाहत असतो तो दिवस. नातेवाईक, कॉलेज तरुण-तरुणी, मित्रमंडळींचे कंपू, कार्यालयीन कर्मचारी एवढंच काय बालगोपाळांमध्येसुद्धा नववर्षाच्या स्वागताच्या योजना आखल्या जातात. धर्म, जात-पात, पंथ असं कशाचंही बंधन नसलेला आणि सर्व जगात अत्यंत उत्साहानं, आनंदानं साजरा होणारा दिवस म्हणजे नववर्षाचा दिवस. जगाच्या कानाकोपऱ्यातला कितीही व्यग्र असलेला माणूस या दिवसाच्या 'सेलिब्रेशन'मध्ये सहभागी होतोच. सर्वच देशांत प्रेक्षणीय रोषणाई आणि लोकांचा सळसळता उत्साह आणि आनंददायी चेहरे बघायला मिळतात.

आज जगातल्या जवळपास सर्वच देशांत ३१ डिसेंबरच्या रात्री बारा वाजताच नववर्षाचं स्वागत केलं जातं; पण फार प्राचीन काळी नववर्षाची सुरुवात एक जानेवारीला होत नसे. नववर्ष साजरं करण्याची सुरुवातच मुळी ख्रिस्तपूर्व इसवीसन ४०० पूर्वी बॉबिलॉनमध्ये झाली. त्या वेळेस नववर्षाचं स्वागत २१ मार्चला करत असत. कालांतरानं अनेक देशांनी स्वतःच्या सोयीनुसार, बुद्धीनुसार २१ मार्चला सुरू होणाऱ्या कॅलेंडरमध्ये बदल केले. वेगवेगळ्या कॅलेंडरमुळे लोकांची गैरसोय होऊ लागली, म्हणून रोमन सिनेटनं सर्वांना सोईस्कर असं कॅलेंडर ख्रिस्तपूर्व इसवीसन १५० मध्ये तयार केलं आणि १ जानेवारी हाच नववर्षाच्या प्रारंभाचा दिवस म्हणून जगन्मान्य झाला.

## पहिल्या क्षणाचं स्वागत...

रोमन पुराणात ज्याचा उल्लेख आढळतो, त्या जानस या देवाच्या नावावरून जानेवारी हे वर्षाच्या पहिल्या महिन्याचं नाव पडलं असावं. जानस हा देव डोक्याच्या पुढच्या बाजूस आणि मागच्या बाजूसही एकाच वेळी पाहत असे, असा उल्लेख आढळतो. ३१ डिसेंबरच्या रात्री म्हणजे वर्षाच्या शेवटच्या रात्री बारा वाजता जानस देव गेल्या वर्षाकडे पाहतो आणि पुढच्या वर्षाच्या नव्या योजना आखतो, असं मानून ३१ डिसेंबरला रात्री बारापर्यंत जागण्याची आणि बारा वाजल्यानंतर नववर्षाच्या पहिल्या क्षणाचं स्वागत करण्याची प्रथा पडली असावी. खरं म्हणजे ३१ डिसेंबरला रात्री बारापर्यंत जागण्याचा मुख्य उद्देश म्हणजे येणाऱ्या वर्षाचं स्वागत करायचं. रात्री जागायचं, तर ग्रुप हवा. त्यातूनच मग मित्रमंडळी किंवा नातेवाईक यांचं एकत्र जमणं सुरू झालं. मग वेळ घालवण्यासाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, पार्टी, मेजवानी, एकमेकांना भेटवस्तू देणं, आनंद व्यक्त करण्यासाठी फटाके उडवणं इत्यादी सुरू झालं. एक जानेवारी हा संपूर्ण जगात नववर्षाचा दिवस मानला जात असला, तरी अनेक देशांत पारंपरिक नववर्षाचा दिवसही मानला जातो आणि बऱ्याचदा त्याला धर्माचं अधिष्ठान असतं. हिंदू नववर्ष हिंदू चांद्रवर्षीय कॅलेंडरप्रमाणं साजरं होत असलं, तरी भारतात विविध राज्यांत वेगवेगळ्या दिवशी नववर्ष साजरं करतात. महाराष्ट्रात गुढीपाडवा हा नववर्षाचा दिवस असतो. पंजाबमध्ये १४ एप्रिलला, आसाम, तमिळनाडू आणि बंगालमध्ये १४ आणि १५ एप्रिलला नववर्ष साजरं करतात. ज्यू लोकांमध्ये ग्रेगेरिअन कॅलेंडरप्रमाणे नववर्षाचे साजरीकरण सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात असते. ते दहा दिवस चालते. पहिल्या दिवसाला 'रोश हशाना' म्हणतात, तर शेवटच्या दिवसाला योम किपूर म्हणतात. पहिल्या दिवशी लोक मेणबत्त्या लावून नातेवाइकांबरोबर नववर्ष साजरं करतात. मधात बुडवून ठेवलेलं सफरचंद खातात, ज्यातून आयुष्यात सर्व काही गोड होणार हे सूचित होतं. ज्यू लोकांच्या समजुतीनुसार, देव दर वर्षी दहा दिवस आयुष्याचं पुस्तक उघडतो. त्यात प्रत्येकाचं भविष्य लिहितो, कोण जगणार, कोण मरणार, कोणाची प्रगती होणार, कोणाची अधोगती होणार इत्यादी. शेवटचा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. या दिवशी लोक उपवास करतात आणि सगळ्या पापांपासून परिमार्जन करण्याची देवाकडं प्रार्थना करतात.





## जुने जाऊ द्या मरणालागुनी

जगभरात नववर्षाचं स्वागत करण्याच्या अनेक पद्धती विकसित झाल्या असल्या, तरी त्या सर्वांच्या मुळाशी एकच समान विचार असतो, तो म्हणजे 'जुने जाऊ द्या मरणालागुनी.' गेल्या वर्षातलं सगळं वाईट विसरायचं आणि नव्या वर्षाचं स्वागत करायचं. दक्षिण अमेरिकेतल्या अनेक देशांत कागदाची रद्दी भरून तयार केलेली माणसाची प्रतिकृती प्रत्येकाच्या घरासमोर उभारली जाते. मध्यरात्री घरातला प्रत्येक जण त्याला अग्नी देऊन जाळतात. त्या प्रतिकृतीच्या प्रतीकात्मक रूपात गतवर्षीच्या दुष्ट रूढी, दुष्ट प्रवृत्ती, वाईट घटना, संकटं, वाईट सवयी आदी जाळून संपवतात. नवीन वर्षी हे सर्व विसरण्याचा प्रयत्न करतात. आजही अनेक देशांतील महत्त्वाच्या शहरांमध्ये ३१ डिसेंबरच्या रात्री बारा वाजता चर्चमध्ये घंटानाद होतो. लोक ड्रम्स वाजवतात, सायरन वाजवतात, गाड्यांचे हॉर्न जोराजोरात वाजवतात, फटाके वाजवतात. जपानमध्ये रात्री बारा वाजता १०८ वेळा घंटा वाजवतात. पूर्वी थायलंडमध्ये रात्री बारा वाजता बंदुकीतून गोळीबार करत. अमेरिकन लोक पिस्तुलानं हवेत गोळीबार करत. रात्री बारा वाजता एवढा आवाज करण्याचा हेतू एकच तो म्हणजे दुष्ट प्रवृत्तींना पळवून लावायचं. दर वर्षी लंडन शहरातल्या ट्रॅफलगार चौकात आणि अमेरिकेतल्या न्यूयॉर्क शहरातल्या ट्रॅफलगार चौकातल्या भव्य टाइम्स स्क्वेअरमध्ये ३१ डिसेंबरला रात्री लाखो लोक एकत्र येतात, खूप ओरडतात, किंचाळतात, हल्लागुल्ला करतात. दुष्ट प्रवृत्ती आवाजानं घाबरतात, हा त्यामागचा समज आहे. थायलंडमध्ये १३ ते १५ एप्रिल असे तीन दिवस नववर्ष साजरं करतात. तीन दिवसांत त्यांचा 'वॉटर फेस्टिव्हल' असतो. त्याला ते साँगक्रान म्हणतात. आपण जसं रंगपंचमीला एकमेकांच्या अंगावर पाणी फेकतो, तसेच ते पाणी फेकतात. लोकांना पवित्र करणं हा त्यांचा उद्देश असतो. या दिवशी गौतम बुद्धांचा पुतळा सुवासिक पाण्यानं स्वच्छ करतात. बौद्ध विहारात जाऊन प्रार्थना करतात. फळं, मिठाई भिक्षुकांना देतात. या दिवशी ते पिंजऱ्यातल्या पक्ष्यांना सोडून देतात. घरांतल्या मत्स्यगृहांतले मासे नदीत सोडतात, त्यामुळं कुटुंबाला चांगलं नशीब लाभतं, हा त्यांचा समज असतो. बरेच लोक नदीकिनारी वाळूचा डोंगर करतात. त्याला 'छेडी' म्हणतात आणि त्यावर रंगीत झेंडा लावतात.

## वाईट इच्छा नष्ट करण्यासाठी घंटानाद

जपानमध्ये नववर्ष एक जानेवारीलाच साजरं करतात. त्याला ते 'ओसेचिरीओरी' म्हणतात. या दिवशी काही लोक झोजोजी मंदिरात जमा होतात आणि नववर्षाच्या आनंदाप्रीत्यर्थ हेलियमचे फुगे आकाशात सोडतात. बौद्ध मंदिरांत १०८ वेळा घंटानाद करतात. १०८ पापांचं परिमार्जन करण्यासाठी; तसंच १०८ वाईट इच्छा नष्ट करण्यासाठी घंटानाद केला जातो. आजच्या कॉम्प्युटरच्या युगातही मित्रांना आणि नातेवाइकांना नववर्षाच्या शुभेच्छा देणारी पोस्टकार्ड पाठवणारा जपान हा एकमेव देश असावा. ही पोस्टकार्ड घरोघरी पोचवण्यात जपानच्या पोस्ट विभागाचे कर्मचारी १५ डिसेंबरपासून व्यस्त असतात, कारण प्रत्येक पोस्टकार्ड एक जानेवारीपूर्वी घरोघरी पोचवण्याचा त्यांचा नियम आहे आणि तो ते कसोशीने पाळतात, हे विशेष. कोरिया देशात नववर्षाची तीन दिवस सार्वजनिक सुटी असते. त्याला ते 'सेऊलाल' म्हणतात. इथं लोक आपल्या मूळ गावी जातात, पितरांसाठी धार्मिक विधी करतात आणि त्यासाठी 'हॅनबॉक' हा विशिष्ट पेहराव परिधान करतात. फिलिपिन्समध्ये ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री लोक जेवण करतात, त्या वेळी गोल आकारातली फळं टेबलावर ठेवतात, दारावर द्राक्षाचे घड बांधतात, गोल डिझाईन असलेले कपडे परिधान करतात, त्यामुळं धनवृद्धी होते, असं मानतात. सर्व दरवाजे आणि खिडक्या रात्री उघड्या ठेवतात, त्यामुळं चांगलं नशीब घरात येतं, असा समज आहे. रात्री बारा वाजता कार्डबोर्डचे किंवा प्लॅस्टिकचे हॉर्न वाजवतात, त्याला ते टोरोटॉट म्हणतात. हॉर्न नसले, तर भांडी, थाळ्यांवर घंटानाद करतात. बांबूच्या तोफा बनवून त्यात दारूगोळा भरून उडवतात. जोरात म्युझिक लावतात. वाईट गोष्टी आणि वाईट प्रवृत्ती हद्दपार करण्याचा हा त्यांचा मार्ग असतो. भूतानमध्ये नववर्षाच्या सणाला 'लोसर' म्हणतात. फेब्रुवारी आणि मार्चच्या दरम्यान १५ दिवस नववर्षाचा सोहळा चालतो. या दिवसांत तिरंदाजीच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा घेतल्या जातात. संपूर्ण जगातून नावाजलेले तिरंदाज इथं स्पर्धेत उतरतात. त्यांच्या प्रथेनुसार कणकेच्या गोळ्यात तांदूळ, मीठ, साखर इत्यादी पांढरे पदार्थ किंवा कोळसा लपवतात. ज्याच्या कणकेच्या गोळ्यात पांढरी वस्तू निघते, त्याच्यासाठी शुभशकुन असतो; पण ज्याच्या गोळ्यात कोळसा निघतो, त्याचा भविष्यकाळ कोळशाप्रमाणे काळाकुट्ट असतो, असं मानतात.

## मनुके खाताना नियोजन

पोर्तुगालमध्ये शँपेनची बाटली उघडून आनंद व्यक्त करतात. घरातले प्रत्येक जण बारा महिन्यांचं प्रतीक म्हणून बारा मनुके खातात आणि प्रत्येक मनुका खाताना त्या महिन्यातल्या नियोजनाचा विचार करतात. या दिवशी एक विशेष केक बनवतात, त्याला 'बोलो री' म्हणजेच 'किंग केक' म्हणतात. गोल आकाराच्या केकच्या मध्यभागी भोक पाडलेलं असतं आणि केकच्या सर्व बाजूंनी गोलाकार सुका मेवा, मनुके, फळांचे तुकडे इत्यादीची सजावट करतात. त्या केकमध्ये ज्याला एखादं कडधान्याचं बी सापडतं, त्यानं पुढच्या वर्षी केक स्पॉन्सर करायचा असतो. ब्राझीलमध्ये नववर्षाच्या दिवशी लोक पांढरा वेष परिधान करून समुद्रकिनारी जातात आणि फटाके उडवतात. पांढरे कपडे शुभ मानले जातात. ब्रिटनमध्ये नववर्षानिमित्त मोठी मिरवणूक काढतात, त्यात लाखो लोक सहभागी होतात. अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरात टाइम्स स्क्वेअर या प्रसिद्ध चौकात सत्तर फूट उंच टॉवरवर बारा फूट व्यासाचा बॉल ठेवलेला असतो. ३१ डिसेंबरला रात्री बारा वाजता हा बॉल खाली आणण्यात येतो आणि नववर्षाच्या स्वागताची सुरवात हल्लागुल्ला, किंचाळणं, फटाके उडवणं इत्यादींनी होते. नेदरलँडमधले डच लोक या दिवशी गोल आकाराचा गोड ब्रेड म्हणजे डोनट खातात. काही लोक गोल आकाराचे वाटाण्याचे दाणे खातात. गोल आकाराच्या वस्तूचा खाद्यपदार्थांत वापर अनेक देशांत केला जातो. गोल वस्तू संपूर्ण वर्षाच्या गोलाकार चक्राप्रमाणं मानतात.

## बारा टोलबरोबर बारा द्राक्षं

मेक्सिकोत नववर्षाच्या रात्री घड्याळाच्या बारा टोलबरोबर बारा द्राक्षं खाण्याची प्रथा आहे. मेक्सिकोत नववर्षाच्या दिवशी घराची सजावट लाल, पिवळा, हिरवा आणि पांढरा या चारच रंगांचा वापर करून करतात. लाल रंग प्रेमाचे आणि जीवनपद्धती सुधारण्याचं प्रतीक, पिवळा रंग अर्थव्यवस्था सुधारण्याचं, हिरवा रंग निसर्गाचं जतन करण्याचं आणि पांढरा रंग उत्तम आरोग्याचं प्रतीक मानतात. या दिवशी गोड ब्रेड बनवतात आणि तो बनवताना काही ब्रेडमध्ये एक नाणं ठेवतात. ज्याला ते नाणं मिळतं, त्याचं भविष्य उज्ज्वल आहे, असं मानतात. एका कागदावर गतवर्षातल्या सर्व नकारात्मक घटनांची किंवा वाईट घटनांची यादी करतात आणि तो कागद जाळून टाकतात. सर्व नकारात्मक गोष्टी नष्ट करणं, हा उद्देश असतो. बेल्जियममध्ये लहान मुलं कुटुंबातल्या मोठ्या व्यक्तींसाठी स्वतः लिहिलेली पत्रं वाचतात. स्वतः डिझाईन केलेली, रंगवलेली, गुलाबाची फुलं आणि रिबननं सजवलेली शुभेच्छापत्रं पालकांना आणि आजी-आजोबांना देतात. फिनलंडमध्ये तर एक वेगळीच परंपरा आहे, त्या परंपरेचं नाव मोलीब्डोमॅन्सी. या परंपरेनुसार शिशाचा तुकडा एका पातेल्यात ठेवून गरम करून वितळवतात आणि लगेच गार पाण्याच्या बादलीत ते शिसे ओततात. गार पाण्यामुळं ते पुन्हा घट्ट होतं, ते जो आकार धारण करतं, त्यावरून भविष्य सांगतात. फ्रान्समध्ये 'एपिफॅनी' नावाची एक पेस्ट्री बनवतात. काही पेस्ट्रींमध्ये छोटी बाहुली ठेवतात. ज्या व्यक्तीला ती बाहुली मिळते ती व्यक्ती त्या दिवशीची राणी किंवा राजा असतो. त्यांना मुकुट घालून सन्मान करतात. ग्रीसमध्ये नववर्षाच्या दिवशी स्पेशल पाय (फळं किंवा मांस यांवर पेस्ट्री टाकून बनवलेलं पक्वान्न) लावतात. त्याला 'व्हसिलोपिटा' म्हणतात. रात्री बारा वाजता 'पाय' कापतात. रात्री बारा वाजता जेवताना घरातली महिला तिचे दागिने एका प्लेटमध्ये ठेवून ती प्लेट टेबलवर ठेवते. घरातल्या आर्थिक सुबत्तेचं ते प्रतीक असतं. जेवण झाल्यावर डिश धुवून ठेवत नाहीत; दुसऱ्या दिवशीपर्यंत तशीच ठेवतात, रात्री-अपरात्री येणाऱ्या अदृश्य पाहुण्यासाठी. आइसलँडमध्ये वेगळीच प्रथा आहे. त्या दिवशी घरातले सगळे जण दूरचित्रवाणीवर विनोदी कार्यक्रम बघण्यात दंग असतात. राजकारणी, कलाकार, प्रतिष्ठित उद्योगपती, महत्त्वाच्या व्यक्ती इत्यादींवर प्रहसनात्मक कार्यक्रम चालू असतो, त्याचा आनंद लुटतात.

## चीनमध्ये आकाशदिवे

चिनी लोकांचं नववर्ष ग्रेगेरियन कॅलेंडरनुसार पहिल्या चांद्र महिन्यातल्या पहिल्या दिवशी साजरं करतात. चिनी लोक रंगीबेरंगी कपडे घालून घरासमोर खूप आकाशदिवे लावतात. त्या दिवशी मोठी मिरवणूक काढतात. रेशमी कपडे परिधान केलेला ड्रॅगन मिरवणुकीत पुढं चालतो. नववर्षाच्या दिवशी घराचं दर्शनी दार लाल रंगानं रंगवतात, घराच्या खिडक्यांना लाल कागदाच्या पताका लावतात, त्यावर happiness, longivity, wealth इत्यादी लिहिलेलं असतं. काही लोक लाल कपडे परिधान करतात. लाल रंग सौख्य आणि चांगलं नशीब याचं प्रतीक मानतात. लाल रंगाचा एवढा वापर का करतात, याबाबत एक दंतकथा आहे. चीनमधला हिंस्र पशू 'नियन' हा खेड्यांतल्या लोकांना त्रास देत असे, मुलांना पळवून नेत असे. त्याच्या त्रासाला कंटाळून त्या खेड्यातले लोक रात्री दुसऱ्या खेड्यात जात असत. एका माणसानं त्याला मारायचं ठरवलं. त्यानं रात्री घराबाहेर खूप लाल कागद ठेवले आणि फटाके लावले. तेव्हापासून नियन दिसलाच नाही. त्यामुळं दुष्ट प्रवृत्ती लाल रंग आणि आवाजाला घाबरतात, अशी चिनी लोकांची समजूत झाली. त्यामुळं दुष्ट प्रवृत्तींना नष्ट करण्यासाठी ते लाल रंग वापरतात. या दिवशी घरातली मोठी माणसं लहान मुलांना लाल पाकिटात पैसे देतात. ही पाकिटं मुलं सात दिवस उशीखाली ठेवतात आणि शेवटच्या दिवशी पाकीट उघडतात. असं केल्यानं सुख लाभतं, समृद्धी येते, असा त्यांचा समज आहे. या दिवशी घरातले चाकू, सुऱ्या, ब्लेड आणि इतर धारदार वस्तू लपवून ठेवतात. या दिवशी बोट कापलं तर कुटुंबाच्या सुखालाही कात्री लागते, अशी त्यांची धारणा असते. या दिवशी कुटुंबातले सगळे सदस्य म्हणजे काका, मामा, आजी, आजोबा इत्यादी एकत्र येऊन जेवण करतात; त्याला 'रियुनीयन' जेवण म्हणतात.



## सेलिब्रेशन'ला बाजारी स्वरूप

अनेक युरोपीय, आशियाई, अमेरिकन देशांत नववर्षाचं स्वागत शक्यतो सर्व कुटुंबीयांच्या समवेत जुन्या परंपरा सांभाळून केले जाते. भारतात मात्र नववर्षाच्या स्वागतासाठी जंगी पार्ट्यांचं आयोजन केलं जातं. त्या पार्ट्या केवळ तरुणांच्याच असतात असं नाही, तर प्रौढांच्यासुद्धा असतात. अशा पार्ट्यांचं आयोजन कोणाच्या घरी करण्यापेक्षा हॉटेलात करण्याचं फॅड वाढलं आहे. हॉटेलवालेसुद्धा भरपूर दिव्यांची रोषणाई करून महिनाभर आधीच डिस्काउंटच्या जाहिराती देऊन, संगीत, नृत्य, जेवण आणि मद्य इत्यादींचं पॅकेज देऊन लोकांना आकृष्ट करतात आणि भरीस पाडतात. या पार्ट्यांमध्ये नातेवाइकांचं निवांत भेटणं, जिवाभावाच्या गप्पा मारणं, सुख-दुःख वाटणं, एखादी छानशी सुचलेली कविता ऐकवणं हे नसतंच. मद्यप्राशन करून नाच, गाणी करून धिंगाणा घालणं हेच प्रामुख्यानं आढळते. मद्याचा कॅफ चढल्यावर बेफाम नाचणं, मुलींशी लगट करणं इत्यादी नववर्षाच्या स्वागताची पद्धत झाली आहे. त्याचे वाईट परिणाम एखाद्या कुटुंबाला आणि पर्यायानं समाजालाही भोगावे लागतात. नववर्षाच्या रात्री मद्यपान करून बेभान होऊन वेगाचं भान न ठेवता गाड्या चालवल्यानं अपघातात दगावल्यामुळे अनेक आई-वडील तरुण मुलांना गमावून बसतात. मद्यपानामुळं शुद्ध हरपल्यावर मुलींची छेडछाड केल्यामुळे किती तरी मुलांना पोलिस स्टेशनवरून सोडवून आणण्याची वेळ आई-वडिलांवर येते. काही तरुण- तरुणी याच पार्ट्यांमध्ये मद्यपान व धुम्रपान करायला शिकतात व पुढच्या वर्षापर्यंत व्यसनाच्या आहारी जातात. थोडक्यात नववर्ष 'सेलिब्रेशन'ला बाजारी स्वरूप आलं आहे.



## भावना चांगलीच

नववर्षाच्या स्वागतामागचा हेतू व भावना चांगलीच असते. नववर्षाच्या निमित्तानं मित्रमंडळी, नातेवाईक, मुलं, सुना, जावई आदी निवांत भेटतात. विचारांची देवाणघेवाण होते, एकमेकांची आस्थेनं विचारपूस करतात, गप्पा होतात, आजच्या धकाधकीच्या आणि घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या रटाळवाण्या जीवनपद्धतीत सणवार साजरीकरणाची गुलाबपाण्याची शिंपण ही प्रत्येकाला हवीशीच वाटते. गळेकापू स्पर्धेमुळे निर्माण झालेली अतिरेकी इर्ष्या, पैसा कमवण्यासाठी चाललेली धडपड व धावपळ, कुटुंबात संवादाअभावी येणारी कटुता, यामुळं मनावर आलेली ताणतणावाची जलभेट झटकून टाकून पुन्हा ताजंतवानं होऊन कामाला लागण्यासाठी सणवार साजरे करणं हवंच. ती आजच्या काळाची गरज आहे. परंतु त्यासाठी नियमांची, नीतिमूल्यांची सीमारेषा ओलांडली जाणार नाही, याची काळजी घ्यायलाच हवी.

## शॉर्ट न्यूज

### मुठेवाडगावकरांचा ईव्हीएमला विरोध

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील ईव्हीएम मुठेवाडगावकरांचा मशिनला विरोध आहे, असे सांगत, ग्रामसभेत ऐनवेळच्या सर्वानुमते हा विषय घेण्यात आला. ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच विजया बाबासाहेब होंडगे होत्या. त्यांच्यासह गावकऱ्यांचा ईव्हीएम मशिनला विरोध आहे. बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्यासाठी आमचा पाठिंबा आहे, असा दावा मुठेवाडगावच्या उपसरपंच होंडगे यांचे पती बाबासाहेब होंडगे यांनी केला आहे.

### सुगाव बुद्रुकमध्ये बिबट्याचा धुमाकूळ

■ **अकोले :** तालुक्यातील सुगाव बुद्रुक येथील रवींद्र जगदाळे यांच्या मालकीच्या गोठ्यात घुसून बिबट्याने १२ शेळ्यांचा आणि पाच कोंबड्यांचा फडशा पाडल्याची घटना घडली आहे. बिबट्याच्या या हल्ल्यामुळे जगदाळे कुटुंबीयांचे मोठे नुकसान झाले आहे. सुगाव बुद्रुक गावातील हनुमान मंदिराजवळ रवींद्र जगदाळे यांचे पत्र्याचे शेड आहे. ते त्यात शेळ्या, कोंबड्या पाळत आहेत. रात्री तीन वाजेच्या सुमारास बिबट्याने शेडमध्ये घुसून शेळ्या व कोंबड्यांवर हल्ला करून फस्त केल्या.

### संगमनेरच्या दोन कत्तलखान्यांवर छापा

■ **संगमनेर :** शहरातील जोर्वे रोडवरील दोन कत्तखान्यावर छापा टाकून पोलिसांनी ३ लाख १० हजार मुद्देमाल ताब्यात घेत १६ जनावरांची सुटका केली. याप्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की शनिवारी पोलिसांना जोर्वे रोडवरील दोन कत्तलखान्यात गोवंश जातीचे जनावरे कत्तलीसाठी डांबून ठेवण्यात आल्याचे समजले. पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक दिनेश आहेर यांनी कर्मचारी अनंत सालगुडे, सोमनाथ झांबरे, यांनी छापा टाकला.

### बॅनर वॉरमुळे जामखेडमध्ये तणाव

■ **जामखेड :** शहरात रविवारी सायंकाळी भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये बॅनर वॉर उफाळले. शहरातील खर्डा चौकातील एकाच जागी आमदार रोहित पवार यांचा लावलेला कटआऊट बॅनर काढण्यावरुन व आमदार राम शिंदे यांचा कटआऊट बॅनर लावण्यावरुन दोन्ही गटांचे कार्यकर्ते, पदाधिकारी आमने-सामने आले होते. त्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. तीन तास चाललेल्या या बॅनर वॉरमुळे पोलिसांची चांगलीच धांदल उडाली.

### ज्ञानाचा उपयोग शेतकरी हितासाठी करावा

■ **राहाता :** कृषी क्षेत्रात मोठी संधी आहे. प्रवरेच्या माध्यमातून कृषी शिक्षण देत असताना सेंद्रिय शेतीवर भर दिला आहे. विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान देत त्यांना प्रत्यक्ष कामाचाही अनुभव या ठिकाणी मिळत असल्यामुळे येथील विद्यार्थी आज सर्वगुण संपन्न ठरणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील यांनी केले. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कृषिशास्त्र संस्थेच्या जल्लोष २०२४ निमित्त आयोजित पालक मेळावा आणि पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रमात शालिनीताई विखे पाटील बोलत होत्या.

# तमाशा सम्राज्ञी कांताबाई फुलवडेकर हलाखीच्या स्थितीत!

## ■ ५० ते ६० कलावंतांचे पोट भरणाऱ्या कांताबाईचे पोट आज रिकामे
## ■ कलेसाठी आयुष्य जाळलेल्या कलावंताची विदारक स्थिती

शिरुर : सतीश डोंगरे

**तमाशा कला हे महाराष्ट्राचे वैभव. कोणे एकेकाळी तब्बल २५ जुन्या तमाशा फडांमधून काम करीत तमाशा शौकीनांची मने रिझवून आता मावळतीकडे झुकलेली शिरुरमधील कांताबाई फुलवडेकर ही लोकनायिका आज हलाखीचे जीवन जगत आहे. एकेकाळी मखमली साड्यात वावरणाऱ्या कांताबाईची साडी आज फाटलेली व मळलेली आहे. ५० ते ६० कलावंतांचे पोट भरणाऱ्या कांताबाईचे पोट ही आज रिकामे आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील हजारो लोककलावंतांची ही शोकांतिका आहे.**





पारनेर दर्शन Special

शिरुर शहरात पेट्रोल पंपानजीकच्या दाटीवाटीतील इंदिरानगर झोपडपट्टीतील एक छोटेखानी खोली हे कांताबाईचे घर, रविवारी सायंकाळी याठिकाणी भेट दिली तेंव्हा घराच्या बाहेर एका तुटक्या खाटेवर कांताबाई शून्यात नजर हरवून बसलेल्या होत्या. तिथेच गप्पांचा फड सुरु झाला. बैलगाडीतील तमाशा पासून सुरु झालेला कलेचा प्रवास मांडताना जगलेल्या वेदना कशा डसत होत्या हे सांगताना क्षणभर त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. कांताबाई या अष्टपैलू तमाशा कलावंत. या वयातही त्यांनी आपल्या दिलखेचक अदानी लावणीचा एक चौक सादर करुन त्या स्वत:ला जुन्या काळात घेऊन गेल्या.

कांताबाई यांच्या आई वडीलांचा बैलगाडीतील जुना तमाशा होता. त्यामुळे तमाशाचे बाळकडू त्यांना लहानपणापासून घरातूनच मिळाले. लग्न झाल्यानंतर त्यांनी पतीसमवेत वगसम्राट मा. चंद्रकांत फुलवडेकर सह गानकोकीळा कांता फुलवडेकर हा तमाशा फड काढला. त्याकाळी त्यांचे फडकला भगवा महाराष्ट्राचा, डोंगराचा राजा यासारखे वग तुफान गाजले.

पुढे पतीचे निधन झाले आणि त्यांचा फड कायमचा बंद पडला. त्यानंतर कांताबाईनी पांडुरंग मुळे मांजरवाडीकर, लेखणी सम्राट गणपत व्ही. माने चिंचणीकर, रघुनाथ काते, रंगनाथ लोहार, कमळाबाई जळगावकर, विठाबाई नारायणगावकर यांसारख्या जुन्या तब्बल २५ तमाशा फडात गण गौळण, नृत्य आणि वगनाट्यात काम केले.

गणपत व्ही. माने चिंचणीकर यांच्या तमाशात पुन्हा जन्माला ये इंदिरा या गाजलेल्या वगनाट्यात भिंद्रनवालेच्या बायकोची भुमिका त्यांनी साकारली.विठाबाई नारायणगांवकर यांच्या तमाशात रक्तात न्हाली कुऱ्हाड या वगनाट्यात सावकाराच्या बायकोची भुमिका वठवली. पाच तोफांची सलामी या ऐतिहासिक वगनाट्यातील त्यांचे पात्र विशेष गाजले. पांडुरंग मुळे मांजरवाडीकर यांच्या तमाशातील पवित्र झाली इंद्रायणी या वगनाट्यात
इंद्रायणीची मुख्य व्यक्तीरेखा कांताबाई यांनी साकारली होती. त्याकाळी मुळे यांनी या भुमिकेसाठी मला ५ हजारांचा शालू घेतला होता, अशी आठवणही कांताबाई यांनी सांगितली.

> **नको परकेपणा..!**
>
> **ऐन उमेदीत तमाशात नृत्य-गायन आणि अभिनय करून अनेकांचे मनोरंजन अन् समाज प्रबोधनाचे कार्य आम्ही केले. आज आमचे हात-पाय गळाले, शरीर क्षीण झाले. आमचा मूळ प्रश्न रोजीरोटीचा आहे. खायला अन्न नसेल तर आम्ही जगणार कसे? तमाशाचा वैभवाचा काळ जगलेले माझ्यासारखे शेकडो जुने कलावंत सांधी कोपऱ्यात पडून आहेत. वयोमानपरत्वे अनेक व्याधींनी त्यांना जखडले आहे. त्यांच्याकडे धड औषधोपचारासाठीही पैसे नाहीत. शासनाने नको परकेपणा... या लावणी प्रमाणे आमच्या भावना समजून घ्याव्यात आणि मदतीचा हात पुढे करावा एवढीच माफक अपेक्षा !**
>
> **कांताबाई फुलवडेकर**
> **ज्येष्ठ तमाशा कलावंत**

काष्टीतील आठवडे बाजारात तिकीटावर पांडुरंग मुळे यांचा तमाशा सुरु होता. गणगौळण, रंगबाजी संपल्यानंतर पवित्र झाली इंद्रायणी हे वगनाट्य लावण्यात आले होते. वगनाट्य ऐन रंगात आले असतांनाच अचानक स्टेजची फळी तुटून माझ्या पायात घुसली. संपूर्ण पाय रक्तबंबाळ झाला. साडी रक्ताने ओलीचिंब झाली. मी स्टेजवरच आडवी झाले. त्यानंतर ससून रुग्णालयात पायावर मोठी शस्त्रक्रिया करण्यात आली, हे सांगताना कांताबाई यांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

वगनाट्यातील सहजसुंदर अभिनय, अचूक शब्दफेक, आवाजाची देणगी यातून तमाशा सृष्टीत कांताबाईची कारकिर्द बहरत गेली. तमाशाचे जुने वैभव पाहिलेल्या कांताबाईसारख्या हाडाच्या कलावंतांनी तमाशाला वेगळ्या उंचीवर नेले पण त्यांच्या वाट्याला कायम उपेक्षाच आली. आजही आयुष्याच्या संध्याकाळी कांताबाई हलाखीच्या स्थितीत जगत आहेत, त्यांची ही परीस्थिती पाहून मन सुन्न होते.

# मी प्रामाणिकपणे दिलगिरी व्यक्त करतो !

## माझ्या स्टेटमेंटचा गैरअर्थ निघाला
## प्राजक्ता माळीची सुरेश धस यांनी मागितली माफी

बीड : प्रतिनिधी



**आमदार सुरेश धस यांनी बीड येथील मोर्चात भाषण करत असताना अभिनेत्री प्राजक्ता माळीचे नाव घेतले होते. यावरून नव्या वादाला तोंड फुटले होते. याच्या निषेधार्थ प्राजक्ता माळीने पत्रकार परिषद घेत आमदार धस यांना माफी मागण्याचे आवाहन केले होते. त्यावर धस यांनी माफी मागण्यास नकार दिला होता. यानंतर प्राजक्ता माळीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची रविवारी भेट घेतली. या भेटीनंतर आता आमदार सुरेश धस यांनी माघार घेतली असल्याचे समोर आले आहे.**

आमदार सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी यांचे जर मन दुखावले असेल तर प्रामाणिकपणे दिलगिरी व्यक्त करतो, असे म्हटले आहे. त्यामुळे या नव्याने सुरू झालेल्या वादाला पूर्णविराम मिळाला असल्याचे दिसते. पुढे बोलताना सुरेश धस म्हणाले, प्राजक्ताताई माळीबाबत माझ्या स्टेटमेंटचा गैरअर्थ निघाला आहे. मला त्यांचा अपमान करायचा नव्हता किंवा त्यांच्या चारित्र्याबाबतीत तर बोलण्याचा विषय नव्हता.

सुरेश धस म्हणाले, मी प्राजक्ताताईसह सर्व स्त्रियांबाबत आदर बाळगतो. माझ्या वक्तव्याचा गैरअर्थ निघाल्याने, त्यांचे किंवा अन्य कोणत्याही स्त्रीचे मन जर दुखावले असेल तर मी प्रामाणिकपणे दिलगिरी व्यक्त करतो, असे सुरेश धस यांनी म्हटले. दरम्यान, मला भाजपच्या कुठल्याही वरिष्ठ नेत्यांचा फोन आला नाही, किंवा कोणी माफीसाठी दबाव टाकला नाही. केवळ चंद्रकांत पाटील यांच्यासोबत माझे बोलणे झाले असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले आहे.

चंद्रकांत दादांचा मला फोन आला होता. चुकला असला नसला तरीही तू क्षमा मागून टाक असे मला त्यांनी सांगितले होते. त्यानंतर मी एक मिनिटांत माफी मागतो असे म्हणत दिलगिरी व्यक्त केली असल्याचे सुरेश धस यांनी म्हंटले आहे. माझ्याकडून चुकलेले काही नाही, तरीही मी दिलगिरी व्यक्त करतो. माझा फोकस हा संतोष देशमुख यांचा झालेला खून, त्याची पुढील प्रक्रिया यावर आहे. माझ्या हातानेच मी ती लिहिलेले आहे, एखादा शब्द इकडे-तिकडे होऊ नये म्हणून मी स्वत:च ते लिहून वाचले आहे. मी ग्रॅज्यूएट आहे, असेही सुरेश धस पुढे म्हणाले.

वाचकांच्या लेखणीतून

# आनंदाचे आवार



खनके कंगना हंसे बिंदिया आएंगे सजना हमरे अंगना डॉ विद्या या हिंदी चित्रपटातील मजरूह सुल्तानपुरी यांचे हे गीत. आर.डी. बर्मन यांचे संगीत आणि गायिका लता मंगेशकर. असा हा सुवर्ण संगम असलेले गाणे आहे. अंगण. आनंदाचे आवार. घराच्या पुढील भागाची शोभा वाढविणारी दिव्य जागा. पूर्वी गावागावात घर आणि वाड्यांपुढे अंगणे असत. दहीभात खाता खाता, वाटीतले दूध चमचा चमचाभर पीतसांडीत अंगणात बालके रांगत. बाळाला नादावण्यासाठी या चिमण्यांनो या गं या, अंगणी माझ्या नाचाया अशी गाणी आई गात असे. किशोरवयीन मुले खेळ खेळत. रात्री पऱ्यांच्या, चेटकीणीच्या, राजपुत्र आणि राजकुमारीच्या प्रेमविवाहाच्या, देवराक्षसांच्या लढाईच्या कहाण्या आजी नातवंडांना सांगत असे. कहाण्या ऐकताऐकताच मुले आजीच्या मांडीवर झोपी जात. मुले भिजत भिजत पावसाच्या गारा याच अंगणात वेचीत. याच अंगणात नागपंचमी सणाच्या वेळी चल गं सई वारुळाला वारुळाला, नागोबाला पूजायाला पूजायाला अशी गाणी गात पोरीबाळी फेर धरीत असत. याच अंगणात तुळशीवृंदावन असे. सकाळ संध्याकाळ वृंदावनापुढे दिवा पाजळला जायचा. तुळशीविवाह होत. याच अंगणात उभे राहून नंदीबैलाचे खेळ होत. अंगणात उभे राहून भिकारभणंग भीक मागे. कधी कधी एखादी तरुणी नटूनथटून आपल्या प्रियकराची अधीरतेने वाट पाहत असे. हळू आवाजात शृंगारिक गाणे गात असे. आता अंगण नावाची संकल्पनाच मागे पडली आहे. शहरांतूनच नव्हे; तर गाव खेड्यांतूनही अंगणे संकोचत संकोचत कधी नष्ट झाली ते कळलेही नाही! माणसांची मनेही संकोचत संकोचत मुर्दाड झाली!
...आणि आनंदाचे आवार दिसेनासे झाले!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

## डॉ.बोरुडे, प्रा. लोंढे यांना साहित्यरत्न पुरस्कार जाहीर

कारभारी बाबर, पत्रकार विनोद गोळे, प्रा. तुषार ठुबे, प्रा. संकेत ठाणगे, कवी सोमनाथ चौधरी, कवी अशोक गायकवाड इत्यादी उपस्थित होते.

डॉ. संजय बोरुडे हे पारनेर तालुक्यातील करंदी गावचे असून ते कवी, लेखक व समीक्षक म्हणून राज्यभर प्रसिद्ध आहेत. त्यांचे दोन कवितासंग्रह, पाच कथासंग्रह, दोन बालकथा संग्रह, सहा अनुवादीत पुस्तके तर एक संशोधनपर पुस्तक इत्यादी साहित्य संपदा प्रकाशित झालेली आहे. त्यांच्या पर्णसुक्त या कवितासंग्रहाचे इंग्रजी, उडिया व मल्याळम भाषेत भाषांतर झालेले आहे. डॉ. बोरुडे हे विविध चौदा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी विविध दैनिकातून लेखन केले असून नांदेड, सोलापूर, राष्ट्रसंत तुकडोजी व मुंबई इत्यादी विद्यापीठांनी त्यांची पुस्तके अभ्यासक्रमात समाविष्ट केली आहेत

प्रा. विजय लोंढे हे मूळ कान्हूरचे असून ते कवी, लेखक व समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा प्रवास हा कवितासंग्रह प्रकाशित असून इतरही काही प्रातिनिधिक कवितासंग्रह, बालसाहित्य, संपादित साहित्य प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांना विविध सहा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

पारनेर साहित्यरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. बोरुडे व प्रा. लोंढे यांचे अभिनंदन केले आहे. नवीन वर्षात शनिवार दि.११ जानेवारी रोजी एका विशेष समारंभात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती पारनेर साहित्य साधना मंचचे संचालक कारभारी बाबर यांनी दिली.

## सरत्या वर्षाला निरोप देताना कर्डेकर भावूक !

बहिण, कुणाचे जवळचे नातेवाईक तर कुणाचे जिवलग मित्र होते. वर्षभरात एकापाठोपाठ या सर्वांच्या जाण्याने कर्डे ग्रामस्थांवर मोठा आघात झाला आहे.

कमावती... तरुण आणि घर सांभाळणाऱ्या माणसांची अचानक एक्झिट झाल्याने अनेक कुटुंबे अजूनही या धक्क्यातून सावरली नसल्याचे कर्डे गावातील वेदनादायक चित्र आहे. हे दुःख आणि वेदना सहजासहजी विसरण्याजोग्या नसल्याचे गावातील जुन्या जाणत्या लोकांनी सांगितले. गेल्या अनेक वर्षांच्या गावच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने गावाने या लोकांना गमावले आहे. त्यामुळे हा आघात सहन करण्यापलिकडे आहे.

कर्डेकरांनी यापूर्वी अनेक सुखद आणि दुःखद क्षण अनुभवले. अनेक संकटातून मार्गही काढले. एकमेकांच्या सुखदुःखात धाऊन जाणे ही तर गावची परंपराच. गावात भैरवनाथ कृपा आणि सुंदर माझे कर्डे यासारखे सुखद आणि दुःखद घटना शेअर करणारे काही व्हाट्सअप ग्रुप आहेत. या ग्रुपच्या माध्यमातून माहिती समजताच अनेकजण मदतीसाठी पुढे सरसावतात त्यातून अर्थिक मदतनिधी उभा राहतो. यावर्षीही अपघातात जखमी झालेल्या गावातील होतकरु तरुणांसाठी ग्रामस्थांनी लाखो रुपयांचा मदतनिधी गोळा केला. परंतू नियतीच्या कालचक्रापुढे कोणाचेच चालत नाही. त्यातून हा मदतनिधी काहींच्या उपयोगी आला तर काहींनी मदतनिधी जमा होत असतानाच अखेरचा निरोप घेतला. ही बाब गावातील सर्वांसाठी रुखरुख लावणारी ठरली.

एकूणच यावर्षी मोठ्या संख्येने गमाविलेल्या आप्तस्वकीयांमुळे झालेल्या आघाताने २०२४ हे वर्षे गावातील सर्वांनाच चटका लावून गेले.

## भक्ष्याचा पाठलाग करताना बिबट्या पडला विहिरीत !

असते. तसेच येथे सिताफळाच्या बागा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे वन्य प्राण्यांना लपण्यासाठी भरपूर जागा आहे. त्यामुळे या परिसरात तरस, रानडुक्कर तसेच बिबट्यांचा वावर दिसून येतो. सकाळी येथील नागरीकांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना याविषयी माहिती दिली. सकाळी नऊच्या सुमारास वनविभागाच्या अधिकारी याठिकाणी दाखल झाले. त्यांनी पिंजरा लावून बिबट्याला जखमी अवस्थेत बाहेर काढले. रात्रभर बिबट्याने विहिरीतील पाईप, वायर रोप व केबलचा आधार घेतला. धडपडत असताना त्याने दाताने पाईप, केबल कुरतडून टाकला. त्यामुळे त्याच्या दातांना व पायांच्या नखांमधून रक्त येत होते. त्याला पुढील उपचारासाठी जुन्नर येथील वनविभागाच्या दवाखान्यात नेण्यात आला. यावेळी या बिबट्याला पाहण्यासाठी नागरीकांनी मोठी गर्दी केली होती. या परिसरात अजून एक मादी व दोन पिल्ले असून येथील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. या ठिकाणी पिंजरा लावण्यात यावा अशी मागणी येथील नागरीकांनी केली आहे.

# निघोजमध्ये नेत्र तपासणी शिबिर

## थिटे महाविद्यालयाचा उपक्रम

**निघोज : प्रतिनिधी**

**शिरूर येथील सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबिर सध्या निघोज येथे सुरू असून विविध उपक्रमांतर्गत निघोज व परिसरातील नागरीकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी रामदास लंके, रविशेठ रणसिंग, नाना वराळ, मनिषा वराळ आदी यावेळी उपास्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनच्या कार्यक्रमाधिकारी मोनाली परभाणे यांनी यावेळी बोलताना शिबिराचा उद्देश स्पष्ट केला.नेत्र तपासणी ही काळाची गरज असल्याचे शिरूर येथील नेत्रतज्ञ डॉ. ढगे यांनी सांगितले. विद्याथ समितीचे प्रज्वल सोनवणे, सलमान पठाण, प्रणव बडगुजर, हिताक्षी यादव यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. यावेळी उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, मुलिका पाणी वाटप संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामदास लंके यांच्या हस्ते नेत्रतज्ञ डॉ. ढगे यांचा सन्मान करण्यात आला.




**सिताबाई थिटे फार्मसी कॉलेजच्या हिवाळी शिबिरात नेत्रतज्ञ डॉ. ढगे यांचा सन्मान करण्यात आला.**

### नियमित तपासणी गरजेची

**आजचा जमाना मोबाईलचा आहे. दोन वर्षांच्या बाळापासून सत्तर वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत मोबाईलच्या माध्यमातून सोशल मीडिया वापराचा मोठा प्रभाव आहे. मोबाईल वापराचा परिणाम थेट डोळयावर होत असल्याने महत्वाचा अवयव म्हणून डोळयांची नियमित तपासणी होते गरजेचे आहे.**

**ज्ञानेश्वर तथा माऊली वरखडे**
**उपसरपंच, निघोज**

### निघोजकरांचा सन्मान

**थिटे फार्मसी महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. व्दारकादास बाहेती यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कार्यक्रमाधिकारी प्रा.मोनाली परभाणे यांच्या नेतृत्वाखाली निघोज येथे सलग दुसऱ्या वर्षी हिवाळी शिबिराचे आयोजन केले हा निघोजकरांचा सन्मान आहे. गावकऱ्यांसाठी भुषणावह बाब आहे. शिबिरार्थींनी परिसरात स्वच्छता अभियान, विविध रोगांची तपासणी शिबिरे आयोजित करून आरोग्याचीही काळजी घेतली आहे. गावकऱ्यांनी शिबिरार्थींना सहकार्य करावे.**

**अनिल शेटे**
**संस्थापक, शिवबा संघटना**

# तलावातील पाण्याचा बेकायदेशीर उपसा थांबवा

## सोपान गुंड यांनी वेधले ग्रामसेवक, तलाठी यांचे लक्ष

**काटाळवेढा : प्रतिनिधी**

**तालुक्यातील काटाळवेढा येथील पाझर तलावातून पाण्याचा बेकायदेशीर उपसा करण्यात येत असून तो तातडीने थांबविण्याची मागणी ग्रामस्थ सोपान गुंड यांनी गावचे ग्रामसेवक व तलाठी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



काटाळवेढा येथील पाझर तलावातून पाण्याचा बेकायदेशीर उपसा होत असल्याचे सोपान गुंड यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी ग्रामस्थांच्या ही बाब लक्षात आणून देत या प्रकाराकडे लक्ष वेधले. ग्रामस्थांनीही बेकायदा उपशाची शहानिशा केली.

पाझर तलावातील पाण्याच्या वापराबाबत तसेच उपशाबाबत असलेल्या नियमावलीनुसार केवळ पाझरलेले पाणी उपसण्याचा अधिकार शेतकऱ्यांना आहे. मात्र काही व्यक्ति नियमावलीचे उल्लंघन करून पाझर तलावातील पाण्याचा बेकायदेशीरपणे उपसा करत आहेत. बेकायदा पाणी उपशामुळे पाण्याच्या व्यवस्थापनावर नकारात्मक परिणाम होत आहे. जल स्त्रोतांचे संरक्षण हे गावाच्या सर्वांगिण विकासासाठी महत्वाचे आहे. त्यात तलावातील पाणी साठयाचा योग्य वापर होण्यासाठी ग्रामपंचायतीची भुमिका महत्वपुर्ण असल्याचे सोपान गुंड यांचे म्हणणे आहे.

गुंड यांनी बेकायदेशीर पाणी उपशासंदर्भात गावाचे ग्रामसेवक तसेच महसूल कर्मचारी तलाठी यांना लेखी निवेदन सादर केले आहे.शासनाच्या प्रतिनिधींनी या गंभीर गोष्टीची तातडीने दखल घेउन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तिंवर कारवाई करावी. पाझर तलावातील पाण्याच्या ठोस व्यवस्थापनासाठी उपाय योजना करून भविष्यातील जल स्त्रोत संरक्षण सुनिश्चित करावे अशी मागणी सोपान गुंड यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# ग्रंथपालन प्रमाणपत्र प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ; जिल्हा ग्रंथालय संघात प्रवेश अर्ज उपलब्ध

**सुपा : प्रतिनिधी**

**मुंबईतील महाराष्ट्र ग्रंथालय संचालनालय व अहमदनगर जिल्हा ग्रंथालय संघामार्फत घेण्यात येणाऱ्या शासनमान्य ग्रंथपालक प्रमाणपत्र प्रवेश परीक्षेची प्रक्रिया सुरू झाली असून दि.५ जानेवारीपर्यंत प्रवेश अर्ज जिल्हा ग्रंथालय संघ येथे उपलब्ध असतील.**




या प्रमाणपत्रासाठी १ जानेवारी ते ३० जुन असा प्रशिक्षण कालावधी असून प्रवेशासाठी बारावी उत्तीर्ण प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र आधार कार्ड, शासनमान्य ग्रंथालयाकडून येणाऱ्या कर्मचाऱ्यांकरीता संस्थेचे मान्यता पत्र आवष्यक आहे. दि. ५ जानेवारी पर्यंत हे प्रवेश देण्यात येणार आहेत.

प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी अहमदनगर जिल्हा वाचनालय, चितळे रोड अहमदनगर येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मोबाईल क्रमांक ८००७३९४२४१, ९५९५६६६७७०, ९७६३२६३४३२, ९६७३६५०८७०, ९४०४८०१६९४ यावर संपर्क करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

या अभ्यासक्रमासाठी १२ वी उत्तीर्ण ही पात्रता असून ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात येते. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी ५ जानेवारी पुर्वी जिल्हा ग्रंथालय संघ येथे संपर्क साधण्याचे आवहन संघाचे संस्थापक सदाशिव शेळके, अध्यक्ष सुरेंद्र शिंदे यांनी केले आहे.

# समाजहितासाठी देणगी हे उन्नतीचे काम !

## नवनाथ महाराज माशेरे यांचे प्रतिपादन




**लोणी मावळा : प्रतिनिधी**

**आई-वडिलांच्या स्मरणार्थ समाजहितासाठी कार्य करणे हे खरोखरच पुण्याचे व आदर्शाचे कार्य असून समाजाला योग्य दिशादर्शक आहे. शैक्षणिक आणि धार्मिक या दोन्ही क्षेत्रांमध्ये देणगी देणे हे समाजाच्या उन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन ह. भ.प.नवनाथ महाराज माशेरे यांनी केले.**

पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील समाजसेवक कै. बबनराव दादाभाऊ शेंडकर यांच्या पाचवे पुण्यस्मरण कार्यक्रम प्रसंगी माशेरे महाराज यांनी प्रतिपादन केले. कै.बबनराव शेंडकर यांचे नातू प्रवीण सुनील शेंडकर व महादू सुनील शेंडकर यांच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या इमारत बांधकामास ५१ हजार रुपये तर मारुती मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी दहा हजार रुपयाची देणगी दिली त्यावेळी ते बोलत होते.

श्री. माशेरे महाराज म्हणाले की,पुढे होणारे शिक्षण क्षेत्रासाठी देणगी ही भविष्यातील पिढ्यांचा विकास आहे शिक्षण हे समाजाचे भविष्य घडवते. शिक्षणाच्या माध्यमातून अनेक गरजू विद्यार्थ्यांना योग्य संधी उपलब्ध होते.ज्ञानाचा प्रसार व शिक्षणाचा प्रसार केल्याने समाज अधिक प्रगत आणि सुसंस्कृत होतो.तसेच धार्मिक क्षेत्रासाठी देणगी संस्कृतीचे रक्षण धार्मिक स्थळे आणि परंपरांचा जपणूक केली जाते, ज्यामुळे समाजात एकता व शांती टिकून राहते. धर्माचे पालन केल्याने व्यक्तीला आध्यात्मिक समाधान मिळते आणि समाजात नैतिक मूल्यांची जपणूक होते.

आई-वडिलांचे स्मरण ही केवळ श्रद्धांजली नसून कृतज्ञतेचा एक भाग आहे. त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ समाजोपयोगी कार्य करणे हे प्रत्येकाने आपली जबाबदारी समजून पार पाडली पाहिजे. शिक्षण आणि धार्मिक क्षेत्रात केलेल्या देणग्या समाजाला आणि व्यक्तीला उन्नतीच्या मार्गावर नेऊ शकतात.व आपल्याला प्रेरणा देते. आपले जीवन केवळ स्वतःपुरते मर्यादित न ठेवता समाजाच्या हितासाठी समर्पित करावे. असे त्यांनी सांगितले. त्यावेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगर तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सुनिल हारदे

## उपाध्यक्षपदी नागेश सोनवणे यांची एकमताने निवड

**नगर : प्रतिनिधी**

**नगर तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सुनिल हारदे ( नवा मराठा ) तर उपाध्यक्ष पदी नागेश सोनवणे ( लोकमत ), सचिवपदी ज्ञानदेव गोरे ( पुढारी ) ,खजिनदार पदी भाऊसाहेब होळकर ( समाचार ) यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.**



नगर तालुका पत्रकार संघाच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यासाठी संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक लहुकुमार चोभे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत अध्यक्षपदासाठी सुनिल हारदे यांच्या नावाची सूचना नागेश सोनवणे यांनी मांडली त्यास माजी जितेंद्र निकम (दिव्य मराठी ) यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते उपाध्यक्ष पदी नागेश सोनवणे, सचिवपदी ज्ञानदेव गोरे, खजिनदार पदी भाऊसाहेब होळकर यांची निवड करण्यात आली.

या बैठकीस संघाचे माजी तालुकाध्यक्ष योगेश गुंड लोकमत ), नितीन देशमुख ( सकाळ ), सुनिल चोभे (नगर सह्याद्री ) शशिकांत पवार ( पुढारी ), बाळासाहेब गदादे ( पुण्यनगरी ) , अविनाश निमसे ( नगर दंवडी ) आदिनाथ शिंदे, शरद कासार ( लोकमत ), दादा आगळे ( सकाळ ), देविदास गोरे ( पुढारी ) आदी उपस्थित होते.

# बुधवारी नाशकात यशप्राप्ती याग

## नव्या वर्षाचे निमित्त सामुहिक हवन होणार

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**नव्या वर्षाचे औचित्य साधून नाशिक येथील धुनीवाले दादाजी परिवार न्यासाच्या वतीने बुधवार दि.१ जानेवारी रोजी यशप्राप्ती यागाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त सामुहिक हवन होणार आहे.**



जीवनामध्ये अनेक सांसारिक, आर्थिक, मानसिक दुःखांना सामारे जावे लागते. प्रत्येक जण सुखी संसार करण्याचा प्रयत्न करतो. मात्र कर्म, दोष, ग्रहांचा प्रभाव, वास्तू दोष, काल सर्प दोष, माता पिता दोष, नकारात्मक विचार, अंतर्गत कलह, मानसिक विकार यामुळे संसार सुखचा होत नाही.

आपल्या देशाला ऋषी-मुनींची गौरवशाली परंपरा आहे. सर्व ऋषींनी आपल्या जीवनात अखंड यज्ञ केले. यज्ञाचा अर्थ अग्नी जे भगवंताच्या निवासाचे प्रवेशद्वार आहे. यश्र हे भक्तांच्या प्रार्थना देवाला कळविण्याचे काम करते. महारूद्रयाग यश्र हे सर्व यज्ञांचे शिखर आहे. हा यश्र केल्यानंतर अकाली मृत्यूपासून मुक्ति मिळते. सर्व पापे नष्ट होतात. या यज्ञातून भगवान कुबेर आणि लक्ष्मी मातेची कृपा प्राप्त होते. मृत्यूचे भय राहत नाही.

प्रत्येक व्यक्तिने आयुष्यात एकदा तरी यश मिळविण्यासाठी यज्ञ केला पाहिजे. कलियुगात आपल्या आजच्या जीवनमानात रोज घसरण होत आहे. तणाव वाढत आहे. मन अस्थिर आहे. अशा कठीण काळात ऋषी मुनींचे सिध्द त्याग आणि अध्यात्मिक विचारच आपल्याला वाचवू शकतात. स्वामी शिवानंद दादाजी महाराज यांच्या हस्ते यश प्राप्ती यज्ञ धुनिवाले दादाजी दरबार, संत जनार्दन आश्रमाशेजारी, लक्ष्मी लॉन्सच्या बाजूला, नाशिक औरंगाबाद रोड, तपोवन नाशिक, पंचवटी येथे संपन्न होणार आहे.

### यशप्राप्ती यज्ञाचे फायदे

**उद्योग व्यवसायात यशप्राप्ती होउन भरभराट, स्वामींच्या कृपेने भय नष्ट होउन नकारात्मक शक्तींपासून मुक्तता, आजार, व्याधी, संतती, गर्भसंस्कारासाठी उपयुक्त, देव देवतांचा कृपा वर्षाव, संसारातील अडचणी, व्यवसायात यश, जागेतील दोष निवारण, बाहय शक्तींपासून मुक्तता आणि शांती समाधान, कुलदेवता, ग्रामदेवता, इष्टदेवता प्रसन्न, मोक्ष प्राप्ती, अध्यात्मिक उन्नत्ती, तपोबल व पुण्याची प्राप्ती, इच्छित संकल्प, फलप्राप्तीसाठी उपयुक्त, जीवन ताण तणाव रहित होऊन आनंदी होते.**

# जलसंधारण, शिक्षण क्षेत्रात स्व. विखेंचे योगदान

## प्राचार्य कुंदा कवडे यांचे प्रतिपादन

**अळकुटी : प्रतिनिधी**

**दुष्काळ हटवून राज्याला सुजलाम सुफलाम करण्यासाठी मा. केंद्रीय मंत्री बाळासाहेब विखे यांनी केलेले प्रयत्न सार्थकी ठरल्याचे सांगातानाच जलसंधारण तसेच शिक्षण क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन अळकुटी महाविद्यालयाच्या प्राचार्य कुंदा कवडे यांनी केले. स्व. विखे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अळकुटी महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले, त्यावेळी कवडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.**



कवडे म्हणाल्या, पारनेरसारख्या दुष्काळी तालुक्याला पाण्याचा प्रश्न भेडसाऊ नये म्हणून त्यांनी मोठया प्रमाणात योगदान देत घाट माथ्यावरून कोकणात वाहून जाणारे पाणी वळविण्यासाठी त्यांची मोठा संघर्ष केला. शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून राज्यातील लाखो तरूणांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्यातही त्यांचे योगदान आहे. त्यातून लाखो कुटूंबांना आर्थिक समृध्दी प्राप्त झाली असल्याचे कवडे म्हणाल्या. यावेळी सचिन वराळ, भाऊसाहेब डेरे, प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे यांचीही यावेळी भाषणे झाली. प्रा. विशाल रोकडे यांनी प्रास्ताविक, प्रा. स्वाती फापाळे यांनी सुत्रसंचलन तर प्रा. अर्जुन चाटे यांनी आभार मानले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार दत्ताजी उनवणे, आयुष वराळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. अमोल नालकर, प्रा. प्रशांत लोखंडे, प्रा. संजय जाधव,, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. शर्मिष्ठा बोरूडे, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. मच्छिंद्र बेलोटे, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. ऋषीकेश गिते, प्रा. पुजा वैरागर, प्रा. पांडूरंग उघडे, प्रा. अनुराधा गाढवे, डॉ. शांता थोरात, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संदीप गेटम, गोरख घोलप, सुर्यमाला भोर, सुनिता भालेराव, नितीन घोलप, विकास सोनवणे, छाया म्हस्के, राहुल बोरूडे, सागर शितोळे, मनोहर कनिंग्ध्वज, मच्छिंद्र म्हस्कुले, वैजनाथ आवारी, रविंद्र वाघ, पांडूरंग शिरोळे, शिवाजी कळंबे यांच्या हस्ते यावेळी वृक्षारोपण करण्यात आले.

# स्मशानभुमीच्या रंगकामासाठी यांचे ५० हजारांची मदत!

## ज्ञानदेव लंके यांची सामाजिक बांधिलकी

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील स्मशानभुमीच्या रंगकामासाठी मळगंगा विकास ट्रस्टचे माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके यांनी ५० हजार रूपयांची मदत करीत आपली सामाजिक बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखीत केली आहे.**



शिरूर येथील सिताबाई थिटे फार्मसी महाविद्यालयाचे हिवाळी शिबिर सध्या निघोज येथे सुरू असून शिबिरार्थींनी स्मशानभुमीची सफाई केल्यानंतर स्मशानभुमीच्या सुशोभिकरणासाठी रंगकाम आवष्यक असल्याने रंग उपलब्ध करून दिल्यास रंगकाम करण्याची तयारी शिबिरार्थींनी दर्शविली होती. संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ तसेच महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. मोनाली परभाणे यांनी चर्चा करून या रंगासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तिचा शोध घेण्याचा निर्णय घेतला. मुंबईत व्यवसायानिमित्त असलेल्या ज्ञानदेव लंके यांच्याशी सचिन वराळ यांनी संपर्क करून संकल्पना मांडल्यानंतर त्यांनी तात्काळ होकार देत रंगासाठी आवष्यक असलेली रक्कम रूपये पन्नास हजार तात्काळ खात्यावर वर्गही केली.

थिटे महाविद्यालाच्या शिबिरार्थींनी जगप्रसिध्द रांजणखळगे परिसर, दशक्रिया विधी घाट, व स्मशानभुमी येथे स्वच्छता अभियान राबवून सर्व परिसर चकाचक केला आहे.

शिबिरार्थींनी मोठे योगदान देत हे काम पुर्ण केल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने ज्ञानदेव लंके, प्राचार्य डॉ. व्दारकादास बाहेती, डॉ. अमोल शहा, सचिन वराळ पाटील, प्रा. मोनाली परभाणे यांना धन्यवाद दिले आहेत.

### एक लाख रूपयांची बचत !

**रंग उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर शिबिरार्थींनी स्मशानभुमीच्या रंगकामास सुरूवात करीत हे काम पुर्ण केले. हेच काम व्यवसायीक रंग काम करणाऱ्यांना देण्यात आले असते तर सुमारे दिड लाख रूपयांचा खर्च अपेक्षीत होता. परंतू शिबिराथनी श्रमदानातून रंगकाम करण्याची तयारी दर्शविल्याने अल्पखर्चात स्मशानभुमीचे रंगकाम पुर्ण झाले आहे.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com